नि.फौ.प्र.२७/२०१९
शासन—वि—शंकर
नि.क्र.२६

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी :—

मी याव्दारे शपथेवर कथन करते की —

माझे नांव :— रमेश लिंगण्णा मिचकंटीवार
वय :— ४० वर्षे, धंदा :— मजूरी
राहणार:— घूबडी, ता. केळापूर, जि. यवतमाळ.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे जे. एम. तुगनायत विशेष सहा. सरकारी अभियोक्ता.</u>**

मी आरोपीला ओळखत नाही. पोलीसांना माझयासमक्ष आरोपीने कोणतीही माहिती दिली नव्हती. तसेच माझयासमक्ष पोलीसांनी आरोपीच्या सांगण्यावरून गजानन बोमीनवारच्या ताब्यातून काही जप्त केले नाही. आता मला मेमोरॅन्डम व जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझया सहया आहेत. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहया अनुक्रमे **नि.क्र. २७ आणि २८** वर आहे.

**साक्षीदार सरकारी पक्षाला सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीत विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

दिनांक १०/१२/२०१८ रोजी रात्री १०:३० वाजताच्या दरम्यान मला पोलीसांनी पो.ठा. पांढरकवडा येथे बोलाविले होते हे म्हणने खरे नाही. आरोपीने माझयासमक्ष चोरीची कबूली दिली होती, हे म्हणने खरे नाही. त्यावरून पोलीसांनी चोरी गेलेला माल गजानन बोमीनवारच्या ताब्यातून जप्त करून मेमोरॅन्डम व जपती पंचनामा तयार केला होता, हे म्हणने खरे नाही. तो मी वाचून त्यावर सही केली होती, हे म्हणने खरे नाही. आरोपीला

वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणने खरे नाही.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे शेख वकील साहेब यांनी नाकारला.**

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले —समक्ष—

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

**(आर. एम. गिरी)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(कोर्ट न.१) केळापूर.

**दिनांक ०७/११/२०१९.**